
श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## .मासिक.

वर्ष १७ | शके १८६२ आश्विन | अंक ७

बाबा बाबा, निशिदिनि मना घोक रे घोक बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे दिव्य जादू अभावा ॥



या शिरडिस्थें, त्यज शरण जा त्या न भग्गा नवाला ॥
या बाबा ना, दुज यमपुरीं, जाण्याची उवाचा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव घैसास

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| श्रीसाईसच्चरित ( अध्यात्म निरीक्षण अ. ९ वा ) ... ... | २५७ |
| बालदोषापराध षोडशी ... ... ... ... | २६१ |
| मूर्तीचें ध्यान कसें करावें .... ... ... ... | २७३ |
| Laksharachana Celebrations (Nellore)... .... | २७७ |
| श्रीसाईबाबांचे चरित्रांतील एका वैशिष्ठ्य बाजूचें निरीक्षण .... ... | २७८ |
| शिर्डी येथील श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचा जमाखर्च ... ... | २८१ |
| अनुभव ... ... .... ... ... | ५१ |


## श्रीसाईभक्तांस विनंती

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चरई रोड, ठाणे यांस कळवावें.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.


**रा. वा. घैसास, संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४.



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६२ ) श्रीसद्गुरु साईनाथ ( वर्ष १७ अंक ७

# श्रीसाईसच्चरित.

—००▭००—

## आध्यात्मिक निरीक्षण.

## अध्याय ६ वा.

———:o:———

ले. सुमन–सुंदर.

" माझिये भक्ताचे धामीं । अन्नवस्त्रास नाहीं कमी ॥ " ६-३३

गताध्यायीं असा - देहधारी परमात्मा साई प्रकटला व आपण आपल्या स्वत्वाची आरति त्याला ओवाळली ! अर्थात् त्याला आपणांस प्रसाद देणें प्राप्त झालें, व तोच त्यानें येथें दिला आहेः—

' माझीया भक्ताचे धामीं । अन्नवस्त्रास नाहीं कमी ॥ ' ६-३३

प्रथम ह्या प्रसादरूपी आश्वासनाचा अर्थ काय तो आपण साधकांनी जाणून घेणें अवश्य आहे. बाबांनी आपणांस भक्ति–उपासना करणेस सांगितली ! ' या परमात्म्याच्या

उपासनेचे पुष्कळ प्रकार आहेत. संकट आल्यामुळें किंवा कांहीं लाभ व्हावा म्हणून उपासना चालविणारे पुष्कळ आढळतात, परन्तु निष्काम उपासना मात्र क्वचित् आढळते. परंतु निष्काम उपासना तीच खरी उपासना. संकट प्राप्त झालें म्हणून परमेश्वराची उपासना आरंभिली असतां परमेश्वर कदाचित् दयाळू होऊन त्याला संकटां-तून सोडवील, अथवा कदाचित् उपासना अपुरी म्हणून उपेक्षाहि करील; हें तर सर्वांनी पाहिलेंच आहे. याचप्रमाणें, कांहीं लाभ व्हावा म्हणून ईश्वरोपासना चालविणारांनांहि मिळणारें फळ अनियमित व स्वल्पच मिळते. परन्तु निष्काम उपासनेचा परिणाम असा होतो की, उपासकाचा शुद्धभाव......ओळखल्यानंतर......सर्वेश्वर भगवान् सर्वच गोष्टी तत्काळ जाणतो, व तत्काळ फळ देतो. व्यसनार्ताला किंवा लाभेच्छुला दोघांनांहि त्यांचें इच्छित प्राप्त करून देण्यासाठीं परमेश्वर आपल्या नियतीच्या साह्यानें त्यांच्या पूर्वकर्मांस अनुसरून फळ देत असतो; पण निष्काम उपासना आपल्याला अगदीं एकनिष्ठेनें व सर्व भावें करून शरण आलेला पाहून परमेश्वर त्याच्या योगक्षेमाचा भार आपणा-वर घेतो व उपासकाच्या पूर्व कर्मांची अपेक्षा न धरतां व नियतीचीहि पर्वा न करतां त्याला मोक्षाचें साधन सिद्ध करून देऊन लगलीच फळास आणतो. आणि हेंच त्याचें महेश्वरत्त्व व हेंच त्याचें महास्वातंत्र्य ! पूर्वकर्म काय किंवा नियति काय, ईश्व-राला विमुख असणाऱ्यावर चालणार. ईश्वराच्या निष्काम व एकनिष्ठ भक्तावर त्यांचा अंमल होत नाहीं. परमेश्वर आपल्या भक्तांचें पूर्वकर्म व नियति यांचें उल्लंघन करतो.........नियति ही ईश्वराची शक्ति आहे. केवळ संकल्प हेंच तिचें स्वरूप होय. आणि परमेश्वर सत्यसंकल्प असल्यामुळेंच ही नियति जीवांना अनुलंघनीय झाली आहे. अशी ही अकुंठित असतांहि ती ईश्वर भक्ताच्या ठिकाणीं कुंठित होते. तेव्हां कुतर्कांच्या भरिस न पडतां आपण त्या महेश्वराला शरण जा. निष्काम भावनेच्या योगानें तो आपणांला आपल्या कल्याणस्थानीं पोंचवील. सुखाच्या शिखरावर जाण्याची हीच पहिली पायरी आहे ! हें सोडून दुसऱ्या मार्गांत जाऊन एवढेंसुद्धां फळ मिळण्याचा संभव नाहीं.' (श्रीदत्तभार्गव संवाद प्र० ७)

आणि हें 'फळ' म्हणजे काय ? तर—

'नाहीं मग देह–गेह–वित्त । परमानंदीं जडेल चित्त ॥—
मन सम–दर्शी आणि प्रशांत । परिपूर्ण निश्चिंत होईल ॥'
'सत्संग केलीयाची खूण । वृत्तीस पाहिजे समाधान ॥' ६–४०–१

वृत्तीस समाधान कशानें मिळतें ? तर 'मनाचा लंगडेपणा' गेल्यानें. केवळ ऐहिक सौख्य मिळून नव्हे; कारण ऐहिक ऐषआराम मिळाले 'कीं' हाव ज्यास्तच सुटत जाते,

' न जातु: काम कामनामुपभोगेन शाम्यति ' जसजशा आपल्या कामना पुरवाव्या तसतशा त्यांना हव्यास कधींच कमी होत नाहीं ' आशा ज्यास्तच सुटत जाते, व विषयतृप्ति होत नाही. ' म्हणून आशा हि परमं दुःखं नराश्यं परमं सुखम् ॥ ' ( भागवत ११-८-४३ ) " आशा तेथं नाहीं सुख। आशेपाशीं परम दुःख। आशा सर्वांसी बाधक। मुख्य दोष ते आशा ॥ ३११ ज्यांची आशा जाये निःशेष। तोचि परम सुख लाहे। ब्रम्हादिक वंदिती, पाये। अष्टमा सिद्धी राहे दासीत्वें ॥ ३ " (नाथ भागवत अ. ९) तेव्हां विषय भोगून कांहीं आशा सुटत नाहीं। अर्थात् परम सुख मिळत नाहीं. कारण ' फल ( परमसुख ) तर त्यालाच म्हणावे, कीं ज्यानें दुःखाचा नाश होतो किंवा सुखतरी प्राप्त होते ' ह्यावरून ज्या अर्थी वैषयिक सुख नित्य नाहीं. उलट ते बंधनांत टाकणारे आहे. त्याअर्थी सद्गुरू आपल्या वैषयिक लालसा पुरवून आपणांला अधःपातांत लोटणार खास नाहीं. मग काय सद्गुरू संसार सोडून संन्यास घ्यावयास लावणार? नाहीं! विषयांचा मोह किति दुस्तर आहे हे तो पूर्णत्वानें जाणून आहे. व जशी वासना उपभोगून शमत नाहीं. तशीच ती न भोगुनही शमत नाहीं एकदां जेवलें कीं पुनः जेवावसें वाटतें. तसेंच अन्नान्न स्थितींत सुद्धां जेवणावर वासना रहातेच! मग वासना भोग भोगुन वा त्यागून जर सुटत नाहीं तर मार्ग काय? तर संसारांत राहूनच संन्यास करावयाच्या वासनेचे विषय उपभोगतांना त्यांकडे दोष दृष्टीनें पहाण्याची संवय करावयाची हें काम भासते तितकें सोपें नाहीं. तें अतिदुर्घट आहे. पण भक्तिनें तें अगदीं सुघट केलें आहे. विषयांचा उपभोग घेतांना परमेश्वराचें स्मरण ठेवणेची संवय प्रयत्नपूर्वक केली कीं कालांतरानें परमेश्वरच उपभोग्य विषय होतो. व भोक्ता त्याच्याशीं संलग्न होतो. त्याला सायुज्यता—फळ—मिळतें! तो देहीं असून विदेही होतो. भोगी असून विरागी बनतो. व तो पूर्ण निर्वासन बनतो! त्याला आशा उरत नाहीं अर्थात् त्याचें समाधान कधींही ढळत नाहीं! त्याची 'समलोष्टवत्कांचन' वृत्ति होते. मग त्याला गुरूनें स्वर्गाचें ऐश्वर्य दिलें काय? किंवा नरकांत लोटले काय त्याला सारखेंच? मतितार्थ हा कीं ऐहिक बाबतींत त्याला अभिलाष रहात नाहीं. व त्या गुरूने दिल्या न दिल्या याची त्याला खंत नसते. म्हणून गुरू जो त्याचा ' योगक्षेम ' चालवितो याचा अर्थ त्याच्या ऐहिक आवडीनिवडी पुरवितो असा नाहीं तर त्याची पारमार्थिक उन्नति करून त्याला आपल्यांत समरसुन घेतों. ' अनन्य शरणं यो मां भक्त्या भजति भूमिका योग क्षेमौच तस्यांह सर्वदा प्रतिपादये ॥ " ग. गी. ७-२० त्यांत तोच अर्थ गर्भित आहे हें आपणांस सद्भक्तांच्या चरित्रांवरून सहज दिसुन येईल. बाबांच्याही 'माझीया भक्तांचे धामी! अन्नवस्त्रास नाहीं कमी ॥ ६-३३ या अर्थाच्या हमींत ह्याच अर्थ अभिप्रेत आहे हें त्यांनीं श्रीबाबासाहेबांच्या [ अ. ४ पहा ] मनाचाच लंगडेपणा घालविला ह्यांत व इतरत्र दिसून येते.

अक्षय ' अक्षय ठेवा लाधेल ! ३-८२ ' हरि निकट नेई की ! ' ६-१६ " निजधाम पावाल । " ६-१७ इ. उक्ती हेंच दर्शवितात.

" भक्ती ही बाभुळ वनींची वाट त्यांचा खळगे अतिबिकट ।
एक पावली परी ती नीट । हरि निकट नेई की ॥
" कांटा टाळूनि टाका पाय । हाचि एक सुलभ उपाय ॥
तरीच निजधाम पावाल निर्भय । निक्षूनि गुरुमाय वदे हे ॥ " ६१६।७

येथें भक्तीचे वर्णन असें केले आहे, तर गीतेंत त्यांचें वर्णन,

' राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।

प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ भ. गी. ९–२ असें केलें आहे ! मग ह्यांतलि खरें कोणतें ? तर दोन्हीहीं खरीच आहेत ! तत्त्वतः त्यांत मुळींच भेद नाही. कारण राजमार्ग झाला तरी त्यावरील निर्बंध कसें पाळावें लागतात याचें विवरण आपण तिसऱ्या अध्ययांत 'तयांस पहिलें वजावें, ३–७८ यावरील निरीक्षणांत केलेंच आहे. राजमार्गावरलि जे निर्बंध तेंच बाभुळ वनांतील कांटे ! निर्बंध पाळून पुढें जा म्हटलें काय किंवा कांटे टाळून पुढें जा म्हटलें काय, अर्थ एकच ! मग ' देव भावाचा भुकेला । ' असे भक्तिमार्गाचें गोडवे गाण्यांत तथ्यांश काय ? तर देव भावाचा भुकेला खरा ! पण कसा ? तर जसें मांजर उंदराचें भुकेले असतें तसाच !—

' इतर देवाची कथा कोण ।
थोरला देव लांचुगा पूर्ण ।
तोही न भेटे जीव घेतल्यावीण ।
भेटल्याचें आपण गर्भवास सोशी ॥ नाथभागवत २–६८

मांजर उंदराचा पाठलाग कोठपर्यंत करतें ? तर उंदीर तोंडांत मिळेपर्यंत. एकदां कां उंदीर तोंडांत मिळाला कीं त्याचें ' खेळ' करून तें त्याला अक्षरशः ' आत्मसात ' करते. देव–गुरुचे पण असेच आहे. देव भिकारी बनतो ! भक्ति मागतो ! अगदीं गळी पडतो ! पण कोठपर्यंत ? भक्त नादीं लागेपर्यंत ! एकदां का भक्त नादीं लागला—भक्तिमार्गांत पडला कीं त्याला चरकांत घातल्याप्रमाणें पुढें खेचून तो त्याला आत्मसात करतो. म्हणजे तत्त्वतःतो त्याला स्वस्वरूपांत मिळवून घेतो खरा, पण त्याच वेळीं उंदराला मांजराच्या तोंडांत व उसाच्या कांड्याला चरकांत पडल्यावर जें ' सौख्य ' लाधतें तेंच मायिक बाबतींत सद्भक्तांना मिळते ! विंचू नेहमीं नांगी वर करून चालतो; पण पाल पाहिल्यावर नांगी खाली करून—निरहंकार तिच्या तोंडांत निमूट जातो ! उंदीर मांज-

राच्या तोंडांत पडतांच हतबल होऊन तें करील तसें ' खेळ ' करून घेतो ! आणि उसाचें कोडे तर बोलून चालून जडच ! पण आपण भक्त ? सर्वसाधारण गुरूच्या आहारीं जाणेस अशी आपली तयारी नसते ! आपण गुरूला शरण जातों तें त्याला ' वश ' करण्याकरितां व आपली सेवा त्यानें करावी या हेतूनें ! आपला ' मी 'पणा गुरुपदीं विलीन करण्यास आपण तयार नसतो. उलट आपलें ऐहिक मनोरथ गुरुनें पुरवावे हीच आपली अपेक्षा असते !

' देई धनभारा । देई पुत्रदारा । हाकिया संसारा । सुखासुखीं ॥
' शिण न दे मशीं । संकट ते नाशीं ।
( आणि या करितांच ) शरण पायाशीं । आलों तुझ्या ॥

आणि हीच वृत्ती धरून आपण हें असे गुरूला शरण जातो. व जो आपले असे कोड पुरवील त्यालाच आपण आपला ' गुरु ' ( ! ) म्हणतो ! पण ' फकीराचा माझ्या न्याराच कावा । ' ३२-१५३, गुरु आपली उपेक्षा करीत नाहीं. कारण त्याला माया कशी दुस्तर आहे हें ठाऊक असतें. म्हणून तो आपल्याला प्रथम चुचकारून घेतो. निराश करित नाहीं. उलट कांहीं काळ आपल्या तंत्रानें घेऊन आपली एखाद दुसरी मनीषा पूर्ण करतो. तेवढ्यावर भाळून आपण त्याच्या नादीं भरलों कीं मग मात्र तो आपला ' कावा ' साधेल, आणि मग ' केलें तुका । झालें माका'अशी आपली गत होते म्हणजे मुदलीं आपण गुरु केला आपले ऐहिक चोचले पुरवून घेणेसाठीं ! पण आतां तोच आपल्याला ऐहिक बाबतींत पूर्ण नागवूं पहातो ! इकडे संसारांतील ' आणा ' सरत नाहीं. व तिकडे गुरुचा ' आणा ' (बा) सुटत नाहीं ! आपण म्हणतो 'माझें पोट भर;' तर गुरु म्हणतो 'माझी झोळी भर !' अशा दुधारी तरवारीवर आपण नाच करतो आणि मग आपणांस कळूं लागलें कीं ' भक्ति ही बाभूळ वनींची वाट । ' ६६–१६ आणि हीच खरी परीक्षेची वेळ असतें ! ' Calamity is the Touch-stone of a man ' म्हणतात तें येथें प्रत्ययास येतें; आपण आपल्या ' मी'पणाला बळी पडलो तर आपण गुरूचा नाद सोडून देतो; गुरुला मुकतो; व आपल्याच अकलेनें आपल्या संसारिक आशा आकांक्षा पुऱ्या करूं पहातों. पण त्यांतही यश येतेंच असें नाहीं; उलट सर्वसाधारण अनुभव उलटाच येतो; म्हणजे त्यांत आपलें इहपर नुकसानच होतें. पण तेंच आपण 'गुरु'ला बळी पडलों, वरील विंचू, उंदीर ऊस यांसारखें त्याच्या आहारीं गेलों, कीं तो आपल्याला आत्मसात करतो व आपल्याला समजतें कीं 'सत्संग' केलीयाची खूण । वृत्तीस पाहिजे समाधान ॥ ६-४१ आणि आचारविचारांत हें समाधान आपण ठेवलें कीं आपली वाट ' एक पाउली ' होते व ती आपल्यास ' हरी

निवट ' नेते ! आपण ऐहिक सुखदुःखें समाधानानें सहन करतो ! आपल्याला समाधान असलें की 'माणुसकी' आपल्यांत उत्पन्न होतें; 'माणुसकी'चा अभाव हेंच दुःखाचें मूळ आहे, त्या माणुसकीच्या बळावर आपण शत्रूला सुद्धां मित्र बनवूं शकतो व आपलें प्रारब्ध समाधानानें भोगतो; म्हणजे ऐहिक कांटे टळतात; व गुरूला सर्वस्वी शरण गेल्यामुळें पारमार्थिक कांटे टळतात; व असें आपण इहपर समाधान लाभून निजधामाला निर्भय पावतो; आपण जीवन्मुक्त होतो !

' अरि तुज व्हावा देव । तरी हा सुलभ उपाव ॥' असे भक्तिचे गोडवे ज्या तुकारामांनी गाइले त्यांनीच ' चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदी नाचे ॥ असेंही म्हटलें आहे. त्याचा अर्थ हाच की ' भक्ति जडणें फार सोपें आहे; एकदां जडलेली भक्ति कधींही फुकट जात नाहीं ! ती नियतीच्या खातीं जमेस पडतेंच पडतें ! जरि आजचे भक्त म्हणविणारे आपण उद्यां कालवशात् अभक्त बनलो तरी आज करीत असलेल्या आपल्या भक्तिचें फळ आपणांस नियतिनियमानुसार पुढें केव्हांतरी मिळणारच; पण ' ज्यासी अर्थ जिज्ञासा नाही । तो भजेना गुरुच्या ठायीं । जरी भजेल कहींकहीं । तरी स्वार्थे पाही विषयाच्या ॥, नाथभागवत १०-२०३ व ही अर्थ–जिज्ञासा म्हणजे 'आपुलें मरण पाहिलें म्या डोळां । काय तो सोहळा अनुपम॥' ही होय.आणि हा सोहळा आपण 'याचि देहीं । याचि डोळा' पाहिला पाहिजे कारण ' देह गेलीया तद्रुपता । होईल हें वचन वृथा । येणेंची देहे येथ असतां । तद्रपता पाविजे ॥ २३८...... ' येणें देहीं याची वृत्ती । आपुली आपण न जाणे मुक्ती । न घेणें भगवत्पदप्राप्ती । तें वृथा उत्पत्ती नरदेहीं ॥ २४५ वृथा त्याचें ज्ञान ध्यान । वृथा त्याचें यजन याजन । वृथा त्याचें धर्माचरण । चैतन्य घन जरी नोहे ॥ २४६ ( नाथभागवत अ० ९ ) आणि याकरतां एकदां जडलेली भक्ति अव्याहत टिकविली पाहिजे ! व हेंच अती व कठीण आहे ! ' तेथें पाहिजे जातीचें । येरा गबाळाचें काम नोहे ॥ ' 'असें गबाळ न रहातां' ' जाति'चे होणेसाठीं ' ' करूं लागती हाडाचें मणी । रक्ताचें पाणी निजकष्टें ॥' ४-७९. देव सुखासीन साधकाकरितां नाहीं तर त्रिविध तापानें ' जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे तो आपुलें ॥ ' आणि हेंच श्रीबाबांनी भागोजी शिंदाचें प्रतीक पुढें करून दाखविलें आहे; ' पूर्व जन्मीचा महापापिष्ट सर्वांगीं भरलें रक्त कुष्ट । भागोजी शिंदा महाव्याधिष्ट । परि भक्त वरिष्ट बाबांचा ॥ ' ७-९८

येथें साधकांनी असा विकल्प घेऊं नये कीं जर अक्षरशः आपल्या अंगावर कोड फुटेल तरच आपण परमेश्वराला प्रिय होऊं ! तसं नाहीं बरं ! केवळ प्रतिक म्हणून बाबांनी कुष्टी जवळ केला आहे. परमार्थ प्राप्तीला अंगरूपाचें महत्व नाहीं. जर देह

त्यागाबरोबर मुक्ति मिळती तर देहत्यागाबरोबरच आपण मुक्त झालों असतों, व ज्ञान-कर्म-भक्ति इ. मार्ग चोखंदळांचे आपल्याला कारणच पडलें नसतें. पण देहत्यागानें, देह कष्टानें, किंवा देहसंन्यासानें मुक्ति मिळत नाही, तर देही असून विदेही अवस्थेनेंच मुक्ति मिळते ! व त्याकरितां खरें कष्ट देहावरचें नसून मनावरचें आहे. कुष्ठरोग्याला जसें जन वाळींत टाकतात तसें मायिक गोष्टींनी आपल्या मनाला वाळींत टाकलें म्हणजे आपण परमेश्वराला प्रिय होतो. याचा पर्याय अर्थ हाच कीं मायिक वस्तूंविषयीं जेव्हां आपण मनानें विरक्त होतो तेव्हांच आपलें परमेश्वराशी तादात्म्य होतें ! " दृढवैराग्यता हे ऐसी । विषयो टेकल्या अंगाशी । चेतना नव्हे इंद्रियांसी । निद्रितापाशीं जैसी रंभा ॥ २८८ ॥ तें वैराग्य कैसेनीं जोडे । तरी सावधान पहातां रोकडे । जग काळें गिळिलें चोहोंकडे । वेगळें पडे तें नाहीं. ॥ २९० ॥ " नाथभागवत अ. ९

आपला भक्तिमार्ग आहे अशी सावधान वृत्ति भक्तिमार्गांत कशी होते ? तर 'निष्ठा आणि सबूरी यांनीं ! '

**' रामनवमी प्रथम झाली । उरुसा पोटीं जन्मा आली ॥ ६.५९ ॥ '**

**रामनवमी:—**राम-जन्म नवमीला होतो. ' राम म्हणजे आत्माराम किंवा आत्मज्ञान ! भक्तिमार्गांत आपल्या हृदयांत आत्मारामाचा जन्म नवमीलाच होतो ! म्हणजे नववी भक्ति जी आत्मनिवेदन ती सिद्ध झाली कीं आत्मज्ञान होऊन भक्त मुक्त होतो. अशी भक्ति केव्हां होऊं शकते? तर **'उरुसापोटीं'** ! व्यवहारांत आपण आनंद वा दुःखातिरेक झाला कीं ' उर भरून आलें ! ' इ. शब्दप्रयोग त्याचे निदर्शक म्हणून वापरतो ! तसेंच ' उरुस ' हा ' उत्कटते 'चा निदर्शक आहे. ' उरुसांत ' उत्साहानें उत्कटतेनेंच लोक भाग घेतात. अध्यात्मांत ही उत्कटता म्हणजे ' तीव्र मुमुक्षा ! ' भक्ताला जेव्हां तीव्र मुमुक्षा होईल तेव्हांच तो उत्कट भक्ति करून आत्मनिवेदन करतो. आणि एकदां कां आत्मनिवेदन झालें—रामनवमी प्रथम झाली– ( कीं, ) तेथून चालली अव्याहत ॥ ६.५९ ॥ तो अखंड स्वात्मानुभवांत रत असतो. येथें ' अव्याहत ' म्हटलें आहे. केवळ ' प्रतिवर्षी ' म्हटले नाहीं ! म्हणजे नुसता स्वरुपानुभव-रामजन्म होऊन भागत नाहीं. तर तो स्वरुपानुभव अव्याहत ठेविला पाहिजे. तरच त्याला ' जीवन्मुक्त ' हें नांव सार्थ ठरेल ! ही भक्तिची परमावधी—ब्राह्मी स्थिति—झाली ! पण अशी स्थिति होण्याला पार्श्वभूमी ही लागतेच ! ती कोणती ? तर ' निष्ठा ' आणि ' सबूरी ' !

**श्री. काका महाजनी:—**जसे काकासाहेब दिक्षीत हे साधक भक्ताचें प्रतिक तसेंच काका महाजनी **निष्ठावंत भक्ताचें** प्रतीक आहेत. दिक्षीतांचा मार्ग ' मनाचा

लेंडेषणा ' काढण्याचा होता. तर महाजनींचा मार्ग ' पूजासंभार समवेत । गोक-
मशिदींत उद्युक्त ॥ ' ६. ६२ हा होता. म्हणजे निष्ठायुक्त भक्तीच्या गोपाळकाल्या
आत्मज्ञान मिळावयानें—अंतरी साईदर्शन ( आत्मज्ञान ) काज ॥' ६.६३ अशा
रितीनें काका भक्तिमार्गे चोखाळीत असतां ' करी उत्सवाची ही मौज ॥ ' ६.६३ भीष्म
म्हणजे त्यांना तीव्र मुमुक्षा झाली. एथपर्यंत भीष्म सबूरी कसे होते ? तर ' स्वस्थचित्त,
वाडियामाजी असतां स्थित ॥ ' ६.६२ पण जेव्हां काकांची—भक्ताची—निष्ठा उच्चा-
च्या-मुमुक्षेच्या-थराला आली तेव्हां ' पाहुनिया समय उचित । भीष्म तेव्हां काकांस
पुसत । सद्वृत्ति एक मनीं स्फुरत ॥ ' ६.६४ सबूरीनें निष्ठेला चालना दिली कीं, " ऐके
वर्षास भरतो उरूस । रामजन्माचा हा दिवस । तरी जन्मोत्सव संपादायास । आहे
अनायास ही संधी ॥ ' ६.६५ तुमच्या निष्ठेच्या जोडीला तीव्र मुमुक्षा होऊं लागली—
उरूस भरूं लागला ! तेव्हां आतां रामजन्माचा—भक्ति सिद्ध होणेचा—काळ आला !
तेव्हां ही संधी साधून—याचि देहीं, याचि डोळां—जन्मोत्सव करून घ्या—आत्म-
ज्ञान संपादा ! '

आतां काकांची भोळी निष्ठा मुमुक्षेच्या थराला आली ! त्यांना ' अर्थ-
जिज्ञासा ' उत्पन्न झाली ! परि उत्सवा लागे कीर्तन । उभा राहिला तोचि प्रश्न ।
खेडेगांवीं हरदास कोठून । ही एक अडचण राहिली ॥ ' ६–६७ अर्थ जिज्ञासा
झाली खरी ! पण ' भक्तिची परमावधी काय ? ' हें कळल्याखेरीज जिज्ञासेचा
पूर्ति कशी होणार ? भक्तिची परमावधी कशानें कळते ? तर ' सविकल्प-
परोक्ष–ज्ञानानें ! ' उत्सवा लागे कीर्तन । ' म्हणूनच तुकारामानींहि नाथभागवताचीं
१,००० पारायणें केलीं ! कीर्तनांत हरिदास सविकल्प ज्ञान सांगतो ! पण ? भोळी
भक्ति बोलून चालून खेडेगांव ! नुसते ' मुखें नाम बोला ' एवढेंच काय ते तिला
माहीत ! मग अशा भक्तिला सविकल्प ज्ञान कसें होणार ? कीर्तनकार कोण भेटणार !
मग काय अशी खेडवळ—भोळी—भक्ति वायांच गेली म्हणावयाची ? नाहीं बरं !
समदृष्टि प्रभुनें आपल्या दरबारांत त्यांची ही सोय करून ठेविली आहे ! ती कशी ? तर
' भीष्म म्हणती मी कीर्तनकार । तुम्ही धरा पेटीचा सूर । राधा कृष्णाबाई, तयार ।
सुंठवडा वेळेवर करितील ॥ ' ६-६८ ज्या सबूरीच्या बळावर त्यानें आपली निष्ठा वाढ-
विली तीच सबूरी त्याला कीर्तनकार होते, मार्ग दाखविते ! तो कोणता ? तर त्यानें
आपला पेटीचा सूर-नामस्मरण-धरला कीं त्याची वृत्ति आपोआप ' सर्वाभूतीं सम ' होते !
व कोणत्याहि मार्गाची परिपूर्ति 'सर्वाभूतीं' समदृष्टि होणें हीच आहे. व हेंच आत्मज्ञान !
हें आत्मज्ञान झालें कीं तेथें ' राधाकृष्णाबाई सुंठवडा तयार करतील. राधा म्हणजे जीव

कृष्ण म्हणजे शिव, सुंठवडा तयार करणें म्हणजे ऐक्य करणें । आत्मज्ञान झालें कीं जीवशिव ऐक्य होऊन समदृष्टिरूप सुंठवडा प्रसाद मिळतो ।

हें सुंदर व सोपपत्तिक विवेचन झालें खरें । पण ? ते भासतें तितकें सोपें नाहीं । कारण 'जन म्हणती माया लटकी । परि ती असे महाचेटकी ॥' ३९-८० संसारांत राहून अशी स्थिति एकाकी प्राप्त करून घेणे फार दुर्घट आहे ।

'टाकोनीया संसार आस्था । जो लागला भक्ति पंथा ॥
'तोचि अधिकारी भागवता । परमार्था ग्राहकू ॥
'ज्याचे पोटीं संसारचिंता । तो कथा ऐकताची दुश्चित्ता ॥
'चित्त चिंती ज्या ज्या अर्था । तो सर्वथा असे तेथें ॥
'चित्त नाहीं जंव सुचित्त । तंव न कळे श्रीभागवत ॥
'गुरुवांचूनी श्रीभागवतार्थ । नव्हे प्राप्त प्राण्यासी ॥'

नाथभागवत १०—७५८।६०

बाबा श्रीकृष्णाचा अवतार अतएव भागवत सांप्रदायी होते ह्याचाच हा पुरावा आहे व म्हणून बाबांनीं रामजन्माख्यान एथेंच न संपवितां पुढें चालू ठेविलें आहे. म्हणजे येथें पुनः तोच प्रश्न आला कीं 'खेडेगांवांत कीर्तनकार कसा भेटणार ? भोळी भक्ति केली खरी पण तिची पूर्ति कशी होणार ?' तर अशी भक्ति दृढ होत गेली कीं गुरु शोधण्याची आस्था उत्पन्न होते. आणि मग,

'सद्‌गुरु प्रत्यक्ष न भेटतां । मनेंची पूजी गुरुनाथा ।
परमादरें पूजा करितां । प्रेम तत्त्वतां न संडे ॥ १३२
'ऐसी सद्‌गुरुची आवडी । ज्याची आस्थाचडोवढी ।
त्यासी गुरुरूपें तांतडी । भेटी रोकडी मी देता ॥ १३८

नाथभागवत अ. १०

म्हणजे ज्या सबूरीच्या जोरावर भक्तानें निष्ठा वाढविली तीच सबूरी त्याला आता गुरु शोधण्यासाठीं अधीर करतेः—

चला की मग बाबाकडे । निरंश हे शुभ कार्या सांकडे ।
शुभासी जे शीघ्रत्व जोडे । साधे रोकडे तें कार्य ॥ ६९
चला आपण पुसावयास । आज्ञा कीर्तन करावयास ॥
( आणि ) ऐसे म्हणतांच मशिदीस । दोघे ते समयास पातले ॥ ७०

आत्ता त्या धराला आल्याबरोबर गुरु भेटी झाली, मशीदीस पातले ! पण ? 'जोंवरी न देखिला पंचानन । तोंवरी जंबूक करी गर्जना ।' सारें गुरुपासून आत्मज्ञान मिळविण्यासाठीं गुरुदर्शना गेला पण जातांच वाचा लुळी पडली ! कारण भोळ्या भक्तांची अशी भावना असते कीं ' गुरुला प्रश्न कसा करावयाचा ? गुरुला प्रश्न करणें म्हणजे गुरुचा अपमान करण्यासारखें आहे ! हें त्याच्या भक्तीला साजेसें असले तरी साध्याला पथ्यकर नाही. कारण, ब्रह्मविद्या जाण । गुरुशिष्य संवाद मंथन ॥ ३४० आणि ' ये मंथनी जरी आळस केला । तरी ज्ञानाग्नीचा आविर्भाव गेला ॥ आपणिया आपण वंचला । थिल्या मुकला साधना ॥ ३४२ नाथभागवत अ. १०

जशी नवपरिणीत वधूची प्रथम भेटींत विमोहित अवस्था होते तशीच अर्थ जिज्ञासु भक्ताची गुरुभेट झाली असतां होते. तेथें जशी वधूला वाचा फुटत नाहीं तशीच येथें शिष्याला वाचा फुटत नाहीं. तेव्हां गुरुलाच पुढाकार घेऊन शिष्याला धीट बनवावें लागतें ! ' काका आरंभ करितां पुजेतें । बाबाच जाहले प्रश्न पुसते ' ' काय वाड्यांत चाललें होतें ' । सुचेना तें काकांना' ॥ ७१ गुरु विचारतो ' कां बाळ, कसला विचार करून आलास ? ' ह्या गुरुच्या शोधक प्रश्नानें तर शिष्य अधिकच गुदमरून जातो किंवा भक्तीच्या परिभाषेंत त्याचें अष्टभाव घडून येतात. **येथेंच गुरु त्याचें हृदय काबीज करतो** ! व यावेळीं गुरुविषयी जें प्रत्यक्ष प्रेम त्याच्या हृदयांत भिनतें ते कालांतरीही कमी होत नाहीं; व त्याच्यावरचा गुरुशिष्याचा संसार सुखाचा होतो. असो, त्याचे अष्टभाव दाटून येतात—'सुचेना तें काकातें ॥ ' पण गुरुला आपलें उद्दिष्ट साधावयाचें असतें; शिष्याला ज्ञानबोध द्यावयाचा असतो; तेव्हां येनकेन प्रकारेण तो शिष्याला बोलता करतो. ' तात्काळ बाबा भीष्माप्रती । तोच प्रश्न अन्यरीती । कां बुवा काय म्हणतां । म्हणवूनी पुसती तयातें ॥ ७२ मग एकदाचा शिष्य भानावर येतो व

व त्याला वाचा फुटते; ' तेव्हां काकास आठव झाला । उद्दिष्टार्थ निवेदियेला ॥ विचार बाबाचे मनास रुचला । निश्चित केला उत्सवा ॥ ' ७३ मग गुरु त्याला आत्मबोध करतो, पण अजून आत्मानुभव देत नाही ! आत्मबोध कसा करतो ? तर ' कशाला येथें बांधीला पाळणा ॥ ' ७९ पाळणा कशाकरितां असतो ? तर जन्मलेल्या मुलाला ठेवण्यासाठीं ! मग मुळांत अज असलेला परमात्मा जीवांशरूपानें जन्म घेतो तेव्हां त्याचा पाळणा कोठला ? तर देह ! व बाबांनी हाच आत्मबोध केला कीं पाळणा बांधावा कशाला ? बाबारे तूं जन्म कशासाठीं घेतला आहेस ? तूं कोण ? करतो आहेस काय ? आणि केलें पाहिजेस काय ? मग तो जिज्ञासु भक्त उत्तरतो कीं, आत्मानुभव म्हणजे काय ? ( कथातात्पर्य ) हें समजावून घेऊन जीवन्मुक्त होऊन पराभक्ति करण्याला !' ही ' कथातात्पर्य आणि योजना । ऐकून मना आनंदले ॥ ' ७९ गुरुला पटलें कीं हा आतां आत्मानुभव चाखावयास योग्य झाला; आणि मग एक हार । घातला काकांच्या कंठीं सुंदर ॥ ' ८० तो त्याला उपदेश देऊन ( हार ) अनुष्ठानास बसवितो; गुरुशिष्याला जपमाळ देऊन त्याला गुरु-मंत्र उपदेशितात व हा गुरुमंत्र शिष्याला ' सोहं '. ' हंस ' ' तत्त्वमसि, ' इ. महावाक्य तुल्यच असतो. येथें हार घालून बाबांनीं हेंच दाखविलें आहे. आतां तो भक्त शिष्य होतो व गुरुपदिष्ट अनुष्टान करून ' कीर्तन भजन समवेत ८३ उत्सव करून घेतो. म्हणजे आत्मज्ञानाचा बोध करून घेतो !

-एथपर्यंत सर्व ठीक जमते ! पण ? ' रामजन्माचिया अवसरीं । गुलाल बाबांच्या नेत्राभितरीं । जाऊनि प्रकटले बाबा नरहरि । कौसल्यें मंदिरी श्रीराम ॥ ' ८४ त्या अनुष्ठानांत त्याला आत्मसाक्षात्कार ( राम-जन्म ) होऊं लागला कीं तो गडबडतो ! कारण तेथें ध्याता, ध्यान, ध्येय, ही त्रिपुटी नष्ट होऊं पहाते. ' पाळण्याचे होतील तुकडे । राधाकृष्णा मनीं गडबडे ॥ ' ८५ जीव शिव द्वैत जाऊं पहातें. ' आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । ' अशी त्याची स्थिति होते. किंवा अलंकारिक भाषेत गुरु नरसिंह रूप घेऊन त्याला आत्मसात् करूं पहातों. ' एकाएकीं आला कोप । प्रत्यक्ष नरसिंहाचें रूप ॥ सुरू जाहले शिव्या शाप । वर्षाव अमूल जाहला ॥ ' ८६ तो नरसिंहरूपधारी गुरु त्याला काय म्हणतो ? ' पाळण्याचे होतील तुकडे । ' ८७ मी तुला जीवानिशीं

आर्इन ! तुझे जन्ममरणाचे फेरे ( पाळणा ) सोडून टाकीन ! म्हणजेच मी तुला मुक्त करून माझ्यांत समरसून घेईन ! '

येथें भक्त मुक्त झाला ! रामजन्म झाला. अर्थात् पाळण्याचे–जन्ममरणाचे–तुकडे झाले ! ' मी तूं ' पणा जाऊन तो गुरुशीं समरसाला. आतां त्याचा देह तत्त्वतः पडला पाहिजे. त्याला पाळणा सोडला पाहिजे. ' काका तेव्हां सरकले पुढां । पाळणा सोडावयातें ॥ ' ८८ तो पाळणा सोडूं पहातों. तो गुरुला म्हणतो ' आतां जर मी तुझ्यांत समरसलो तर ह्या देहाची उपाधी तरी कशाला हवी ? तोही तुझ्या चरणींच वहातो ! ' पण गुरूला एवढ्यावरच कार्यभाग संपवावयाचा नसतो. ' तंव तो बाबा अती कोपले । काकाचिया अंगावर धावले । पाळणा सोडणें जागींच राहिले ॥ ८९ तो त्याला देह सोडून देत नाही ! तो ' वृत्तीवर ' येऊन शांत चित्तानें त्याला काय बोध देतो ? " एव्हांच कैचा पाळणा सोडतां । आहे आवश्यकता अजून ॥' ९० बाळ तूं माझ्यांत समरसलास खरा ! पण प्रारब्धानें जन्मलेल्या देहाला प्रारब्ध भोगूनच देह ठेवला पाहिजे ! प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः । ' तेव्हां प्रारब्ध संपेपर्यंत तुला देह असणें प्राप्त आहे. इतक्यांतच सोडून चालणार नाहीं. शिवाय ' नाहीं झाला गोपाळकाला । उत्सव सरला न म्हणावें ॥ ९२ तूं आतां जीवन्मुक्त झालास ! तुझे कार्य झालें ! तूं आतां देही असलास तरी तत्त्वतः विदेही आहेस ! पण हा स्वार्थ तूं साधलास ! आतां पराभक्ति करून तूं लोकसंग्रह कर ! लोकांना सन्मार्ग दाखवून त्यांनाही मार्गाला लाव; तरच उत्सव सार्थ ठरेल व सर्व लोकांना मुक्ति मिळेल. नाहींतर प्रत्येक जीवन्मुक्त जर आपण जीवन्मुक्त झालो एवढ्यावरच तृप्त राहील तर, या इतर अज्ञ जनांना मार्ग दाखविणार कोण ? ह्या करितांच मी मुक्त असतां तुझा अभिलाष धरून तुला शिष्य केलें व ह्याच अर्थानें ' मुलगा झाल्याशिवाय ( निपुत्रिकाला ) स्वर्ग नाहीं. " अशी भाषा शास्त्रकार वापरतात. म्हणून ' लोकांना सम्रहायैत द्विद्वान् कुर्यादसच्चकधीः ॥ " ग. गी. २. २५ म्हणून तूं लोकसंग्रह कर, गोपाळ काला कर व पाळणा—देह—सोड ! " यावर भक्त " जीवें घेऊनि जीवा । देहत्व मोडूनि देहभावा । याहिवरी करविसी सेवा । हें लाघव देवा नवल तुझें ॥ " ( नाथभागवत ४—२ ) असें म्हणून पराभक्ति करून लोकसंग्रह करतो ! [अपूर्ण]

श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः

# बालदोषापराध षोडशी

पृथ्वीवृत्त.

न पद्य नच गद्य, ये, नच कला हि गानादिका ॥
न धर्म, नच शास्त्र, ये, क्रतु[1] न कर्म त्या वेदिका[2] ॥
सदा अळस पेंग ये, जणुं किं खादिली आफु का ॥
अशा अमति बालका, गुरु कशास पोसा फुका[3] ॥ १ ॥

गृहीं अडकुनी बसे, जशि किं शेंबुडी मक्षिका ॥
गुळीं जशि पिपीलिका, विभेंवि[4] सर्पिणी रक्षिका ॥
परिगृहिंच हांव हो, बहु जणूं जगद्भक्षिका ॥
अशा कुमति बालका, गुरु कशास पोसा फुका ॥ २ ॥

स्वदार, सुत कन्यका, श्वशुर सासु ही मालिका ॥
बसे गिळि तयासवें, जिलबि, बासुदी पोलिकों[5] ॥
वरान्न[6] घृत भक्तँ[7] ही, सुरस शार्क[8] कोबी, चुका, ॥
अशा दुरितें[9] बालका, गुरु कशास पोसा फुका ॥ ३ ॥

न घासभर अन्न दे, गरिब पोरक्या याचका ॥
न धान्य, फल, तोय दे, शुनेकं[10], धेनु कोकों[11] शुकों[12] ॥
न देत उशिटेंहि, ये, कुणिहि घेउनि सौलिकों[13] ॥
अशा अधम बालका, गुरु कशास पोसा फुका ॥ ४ ॥

---

१ यज्ञ, याग ( Sacrifice, any pious or devotional act ) २ स्थंडिल- ( Sacrificial altar ), ३ फुकट ( for nothing ), ४ पैसा, धन, संपत्ति, यांच्यावर, ५ पोळी, चपाती, ६ वरण, ७ भात शिजविलेला, शाल्योदन ( Boiled rice of Superior kind ), ८ भाजी, ९ पातकी, १० कुत्रे, ११ कावळा, १२ पोपट, १३ झोळी.

गुरो भणिरे शारदा, अनसुया चुडाळांबिका ॥
न आठवित हा कदा, जननि रुक्मिणी चंडिका ॥
न मुक्ताई न गोणाई, जनाई, राजाई, रेणुका ॥
अशा परम आळशा, प्रभु कशास पोसा फुका ॥ ५ ॥

गुरो, न अभिवांदिले, मुनि वशिष्ठ व्यासा शुका ॥
मनीं न कधि आणिले, सनक नारदा वाल्मिका ॥
स्मरे गुरु चिदीश ना, भवनदी-सुधी-नाविका ॥
अशा पतित आळशा, प्रभु कशास पोसा फुका ॥ ६ ॥

दिठी असुनि अंध, ना, बघत रामदासा तुका ॥
दिल्या श्रुति बधीर हा, परिसि वा कथा धार्मिका ॥
भवद्वपुर्परीमळीं, बधिर, आसुनी नाशिका ॥
अशा कुटिल आळशा, प्रभु कशास पोसा फुका ॥ ७ ॥

न आत्मरससेवनीं, क्षेये असूनि तोंडा मुकी ॥
त्वचा दिलि बधीर हा गुरुसुस्पर्शमोदा टुका ॥
दिले कर, खुळा, न चेपि हि कदा भवत्पादुका ॥
अशा मलिने आळशा, प्रभु कशास पोसा फुका ॥ ८ ॥

---

१ बुद्धिदेणारी, २ सरस्वती, ३ अत्रिमुनि भार्या, ४ शिखिध्व राजाची राणी चुडाळामाई, ५ पार्वती, ६ मुक्ताबाई, ७ गोणाबाई नामदेवांच्या मातुःश्री, ८ जनाई नामदेवांच्या दासी, ९ राजाई-नामदेवांची भार्या, १० भगवान् परशरामाच्या मातुःश्री, ११ भगवान ज्ञानेश्वर, १२ संसार नदीतून तारून नेणारे बुद्धिमान् नावाडी, १३ दृष्टी, १४ काळ, १५ बहिरा, १६ आपल्या अंगाच्या सुवास घेण्याचें कामीं नाक असून असमर्थ-बहिर Blunt., १८ नाक, १९ अप्रामाणिक, २० ब्रह्मरस चाखण्याचे कामीं २१ समर्थन, २२ उपासी, २३ त्वगिंद्रिय कातडें, चामडें, २४ बहिर Blunt., २५ आपल्या सुंदर स्पर्श सुखानंदाला, २६ कमी असमर्थ, २७ घाणेरडा.

दिले चरण, पांगळा, कधि न जाय यात्रादिका ॥
गिरा दिली तरी विभो, भजनिं कीर्तनीं, हा मुका ॥
सुटे न भववासना, जशि रतिस्पृहा कामुकी ॥
अशा करंटे कारट्या, विभु कशास पोसा फुका ॥ ८ ॥

दिली भरुनि आपणा, कधि चिलीम नाहीं हुका ॥
दिला न कधि आपणा, मधुर, गोड मेवा सुका ॥
कथा भजनि लाविला, न कधि साधुसंता बुका ॥
अशा कलुष कारट्या, विभु कशास पोसा फुका ॥ १० ॥

असूनिहि कुलीन हा, कुजन सेवि, झेली थुका ॥
म्हणूनि जनसंकुलीं, सतत होय ना ? छी, थु, कां ॥
परी न उमजे कुजे, भविं च खात धक्का-बुका ॥
अशा कठिण कारट्या, विभु कशास पोसा फुका ॥ ११ ॥

चळेंच मुखि घालण्या, दिधलि नाम-सद्गूटिका ॥
मुखा नुघडि नेत्र ही, गिळि न तें अधो-घंटिका ॥
न शुद्धिवरि ये परी, चघळि हा भवाचा भुका ॥
अशा कर्मरे कारट्या, विभु त्रिशुद्धि पोसूं नका ॥ १२ ॥

---

१ वाणी, वाचा, २ भोगेच्छा, ३ विषयासक्त, ४ करंटा, दुर्दैवी, ५ श्रेष्ठ, शक्तिमान, प्रभु, परमात्मा, ६ पातकी, ७ लोकसमुदाय, ८ गुरु, परमात्मा. नामरुपी उत्तम गोळी, ९ घशाखालीं, १० संसाराचा, ११ भुसकट, फोलकट, कोंडा, तूस, भूस, फोल, १२ विषयांध.

परी जननि, तात, ही तुम्हि सुहृज्जगत्पालका ॥
जगज्जननजालका[1]—चतुर कौलिका[2], मालका ॥
गुरो सदय आपुले, हृदय ठाउके बालका ॥
विमूढ किति हा जरी तरि हि ठेववे कां भुकी[3] ? ॥ १३ ॥

स्वभाव तुमचा गुरो, मज उदार हा ठावका ॥
न पोशिल म्हणा जरी, तरि उणे जगन्नायका ॥
न सूक्ष्म कृमि जंतु ही, तुम्हि कदापि ठेवा भुका ॥
न दत्तगुरु साइमा, क्षुधित[4] ठेववे सेवका ॥ १४ ॥

नृशंसे हरि[6], व्याघ्रही, अहि खगांतकां वृश्चिकां[8अ] ॥
रिपू, शठ,[10] सुदुर्जना, अदय तस्करां, घातकां ॥
अशासहि सुपोषणें, प्रभु नें[15] आपलें ब्रीद कां ?
किती अत्रपें[16] बाल हा, तरि बुभुक्षु ठेवाल कां ? ॥ १५ ॥

"स्वदास-जन-माउली" तुम्हि प्रसिद्ध या लौकिका ॥
कुपुत्र किति जाहला, तरि विटे न ती अंबिका ॥
वपू, वचें[20], मनांनि[21] घ्या, सतत सक्त सेवाऽचुका[22] ॥
करा रत[23] सदा पदीं[24], मग खुशाल पोसा ठका[25] ॥ १६ ॥

ठाणें, माघ शु. १२ गुरुवार १८६१, दि. २२।२।४०  —बाबांचें बाळ

---

१ विश्वाच्या जन्माचें जाळें. २ विणण्यांत कुशल कोष्टी. ३ उपाशी. ४ उपाशी. ५ क्रूर. ६ सिंह. ७ विषारी सर्प. ८ पक्ष्यांचा नाश करणारा ससाणा. ८ अ विंचू. ९ शत्रु. १० फसवे. ११ अत्यंत वाईट लोक. १२ दुष्ट. १३ चोर. १४ खुनी. १५ नाही. १६ निर्लज्ज. १७ उपाशी. १८ आई. १९ शरीर. २० वाचा, वाणी. २१ मनानें. २२ अचुका=अचुकता, बरोबर. २३ रममाण, गुंग, लुब्ध. २४ आपले चरणी. २५ लबाड.

श्री. संपादक, श्रीसाई लीला, यांसी सप्रेम नमस्कार विशेष:—

कपिल महामुनींनीं आपली आई देवहुती इजला श्रीभगवंताचे मूर्तीचें ध्यान कसें करावें तें सांगितलें आहे. त्याजबद्दल भागवताचें तृतीय स्कंधांत सविस्तर वर्णन आलें आहे. तें प्रभाकर नांवाचे एका कवीनें एका आरतीत सुंदर रितीनें वर्णन केलें आहे ती आरती भक्तांस ध्यान करण्याला उपयोगी पडावी या हेतूनें आपणांस प्रसिद्ध करणेस पाठविली आहे. कळावे. ही विनंति.

आपला,
श्री. ना. खारकर,
ऑ. चि.

॥ श्री ॥

# मूर्तीचें ध्यान कसें करावें ?

—0⊜0⊜0—

ज्या चरणांपासून, जान्हवी भू–तलासी आली । जान्हवी भू–तलासि आली ॥
हिमालयाहुनि लहान पुढें ती सहस्रमुखी जाली ॥
ध्वजवज्रांकुश ऊर्ध्वरेषा पद्तळव्याखालीं । रेषा पदतळव्याखालीं ॥
अरुण प्रभेसारखी विराजित नखांगुली लाली ॥
जीं सुंदर पाउलें, रमा मिठी घाली । पाउलें रमा मिठी घाली ॥
पूर्णानंदी निमिग्न होउनि सर्व सुखी झाली ॥
॥चाल॥ पोटऱ्या सरळ दोन्ही, तेजस्वी शिरा सजदार ॥
वर्तुळाकार गुडघे तुळतुळीत किती भरदार ॥
निर्मळ गोंडस जानु गोजिरें किती अरुवार ॥
स्वच्छ कसा कटिभाग, पितांबर पीत रुळे वरुती ॥
रत्नखचित मेखला, घागऱ्या मधूर रव करिती ॥
चला जाऊं दर्शनासि पाहूं परब्रह्म मूर्ती ॥ गुरुची परब्रह्म मूर्ती ॥
अनन्यभावें शरण रिघुनि । करुं माधवासि आरती ॥१॥

नाभी कमळांतून विधीला पार प्रगटवीलें ।। विधीला पार प्रगटवीलें ।।
उदरामध्यें ब्रह्मांडकौतुकें, करुनी सांठविलें ।।
सोसुनि लत्ताप्रहार भृगूला, विनवुनि आळविलें । भृगूला विनवुनि आळविलें ।।
वक्षःस्थळींतें अक्षय भूषण प्रभुनीं वागवीलें ।।
श्री वत्सलांछन नाम पदाचें, अनन्य ठेवियलें ।।
ब्राह्मण माझें कुळदैवत हें, वदुनि दाखविलें ।।
।।चाल।। कौस्तुभमणी कंठीं, दैदीप्यमान मिरवे ।।
आपाद वैजयंती हाराचे पदर बरवे ।।
तुळशिचे घोंस ताजे, टवटवीत तुरे हिरवे ।।
वास सुटला फार म्हणोनी भ्रमर गुंगत फिरती ।
म्हणोनी भ्रमर गुंगत फिरती ।।
वास घेऊनी निर्चित थारा, कितेक रव करिती ।।
चला जाऊं दर्शनासि पाहूं परब्रह्म मूर्ती । गुरुची परब्रह्म मूर्ती ।।
अनन्यभावें शरण रिघूनि करुं माधवासि आरती ।।२।।
चतुर्भुज नारायण नटले, घनश्यामवर्णी । नटले घनश्यामवर्णी ।।
उजेड पडे भोंवता, दिसे काळिच तळिं धरणी ।।
शंखच शोभे, पद्म गदा करिं, चक्र कनकभरणीं ।।
गदा करिं चक्र कनकभरणीं ।।
समुद्रमंथनि दैत्य घातले, याचि हातिं धरुनी ।।
मकराकृति कुंडलें झळाळी, तळपतात श्रवणीं । झळाळी तळपतात श्रवणीं
एक पूर्णवत चंद्र वसविला, दुसरा वर तरणीं ।।
।।चाल।। हनुवटी अधर चिमणी, पडे गालावर दीप्ती ।।

कुंदाच्या कळ्या दंत, त्यापुढें हिरे लपती ॥
थरथरीत नासिकाग्र, पाहुनियां रवी लपती ॥
नेत्र मिनासारखे भोंवथा सुसाग्र तरतरती ॥
मदन धनुष्या लाज आणुनी, गर्व सदा हरती ॥
चला जाऊं दर्शनासि पाहूं परब्रह्म मूर्ती । गुरुची परब्रह्म मूर्ती ॥
अनन्यभावें शरण रिघुनि करुं माधवासि आरती ॥३॥
विशाळ भाळीं, गंध केशरी, नाम ठसा चमके। केशरी नाम ठसा चमके ॥
कस्तुरिचा घवघवित मनोहर, दिव्य टिळा झमके ॥
कुरळ केश मस्तकीं मुकुटमणिमय सारा झमके ।
मुकुटमणिमय सारा झमके ॥
कलगितुरा शिरपेंच पाचुचा, तळिं लोलक लुमके ॥
भक्तजनांचें सौम्य ध्यान हें, खळचि मनि धमके ॥
ध्यान हें खळचि मनि धमके ॥
चिंतनांत प्रत्यक्ष सांवळी, मूर्ति पुढें ठुमके ॥
॥चाल॥ दाखला भागवतींचा, पाहूनि कवन करितों ॥
वर्णन हें तिसरे स्कंधीं, कपिलाचिं वचनें धरतों ॥
सद्गुरु कृपें करूनी, आरती यमक भरितों ॥
म्हणे प्रभाकर, अशीच देवा, द्या मजला स्फूर्ती ॥
देवा द्या मजला स्फूर्ती ॥
पदारविंदीं जडो निरंतर मति माझी पुरती ॥
चला जाऊं दर्शनासि पाहूं, परब्रम्ह मूर्ती । गुरुची परब्रह्म मूर्ती ॥
अनन्यभावें शरण रिघुनि, करुं माधवासि आरती ॥४॥

पुणें. ता. २४–७–४०

( ल. ग. बापटकृत विचारजागृती सन १९३५ पान २२६ ते २२८ )

———

Om

# SRI SAI BABA

## Laksharchana Celebrations

Dear Sir / Madam,

## LAKSHARCHANA

Will be performed to Sri Sathguru Sai Baba from 2nd Oct. to 10th Oct. '40 at Ayllakshamma Street, Nellore.

There will be Poor Feeding in the morning and Procession in the evening on 11-10-40.

You are cordially invited to attend the celebrations daily with all your relations & friends.

### —: PROGRAMME :—

*Every Day:—*

| | |
|---|---|
| 6 A. M. to 12 Noon— | 11 Abhishekams<br>5 Sahasranamarchanas<br>Recital of Ramayana and Bhagavadgeeta |
| 5 P. M. to 6-30 P. M.— | Lectures (Gentlemen are welcome to lecture on their experiences about Sri Sai Baba, if any) |
| 7 P. M. to 9-30 P. M.— | 6 Sahasranamarchanas |
| After 10 P. M.— | Bhajanas, etc., |

ORGANISING COMMITTEE.

Dr. M. K. Rajagopalchari
Dr. T. S. Vas
C. Sitaramiah
C. Venkatarama Nayudu
P. T. Gopalachari. B. L.
Rao Sahib C. Subbaiah Chetty

M. V. Subba Rao, B. L.
M. Hanumantha Rao
G. Sanjeeva Rao, B. L.
P. V. Ramianah
M. Rama Rao
B. S. N. Murty

# श्रीसाईबाबांचे चरित्रांतील एका वैशिष्ठ्य बाजूचें निरीक्षण.

—:×:—

पुरातन काळापासून हिंदु-मुसलमानांत प्रापंचिक व पारमार्थिक बाबतीत हिंदुस्थानांत एक तऱ्हेचे सख्य नांदत असलेले आढळून येते. या बाबतीत टिपू सुल्तान व त्याचा बाप हैदर या उभयतांचा त्यांचे राज्यांतील शृंगेरी मठाधिपति श्री जद्गुरू या हिंदूस्वामिचेबद्दल फार आदर व भाव वसत होता. असें आलीकडे उपलब्ध झालेले ऐतिहासिक कागद पत्रावरून दिसून येते. या बाबतींत मुं. क्रॉनिकलचे ता. २१–४–४० चे अंकांत पान २ वरील लेख जिज्ञासूनी जरूर पहावा.

श्री साईबाबांचे अवतारकार्य तरी याच धोरणाचे दिसून येते. त्यांचे धोरणाचे पुढील प्रमाणें पुरातन दाखले उपलब्ध आहेत.

(१) नजुंडेश्वर देवाल्यांत हायदरलिंग आहे. हे देवालय नंजुनगड येथें आहे, व त्यांतील लिंगही हैदराची देणगी असोन त्यानें आपले हयातींत हे देवालय चांगले स्थितींत राखून त्यांस पुष्कळ मौल्यवान देणग्या दिल्या.

(२) आनंतापूर जिल्ह्यांत कादिरी येथील देवालय व मशिद यांच्या पूर्वी परस्परांचे वार्षिक रंगविणेकरितां देणग्या देणेची प्रथा होती. अलिकडे ती बंद पडली आहे.

(३) त्रावणकोर येथील सावरीमलाई टेकडीवरील देवतेची यात्रेकरुनीं मशिद, हिंदू देवालय व बुद्ध देवस्थानें यांचें दर्शन घेतले पाहिजे अशी आज्ञा आहे, असें समजतात.

(४) मदुराजवळील टेकडीवर सुब्रमन्यांचे देवालय व शिकंदर फकिर या मुसलमान साधूची समाधि आहे. या दोहींची यात्रेकरी पूजा करतात.

(५) नागोर येथील मिरन साहेब नांवाच्या मुसलमान साधूचें समाधिचें दर्शनास हजारों हिंदू, मुसलमान जातात.

(६) बाबा बुदन टेकड्यांवर ' पीत ' समाधी आहे. ही दत्तात्रयाची आहे, असे हिंदू मानतात व मुसलमान तिला हजरत दादा हायत मीर कुलंदर नांवाचे मुसलमान साधूची म्हणून मानतात तेथील पुजारी मुसलमान आहे. तो दोन्हीं धर्माच्या पुजा करितो उभय धर्मीयांस पूज्य असे ' धवल पान गुहा ' हें एक स्थान असंच चितल दुर्ग येथें आहे.

(७) परंतु सर्वांत या उभय धर्मीयांचे ऐक्याचे एक फारच आश्चर्यकारक उदाहरण म्हणजे होनूर फकीर वर्ग म्हणून असलेला पंथ. त्या पंथाप्रमाणें हिंदू व मुसलमान या दोन्हीं गुरुंची दिक्षा मिळाल्याशिवाय भक्त त्यांचे पक्षांत पूर्ण दाखल होत नाहीं. हा पंथ पीरबाबा फकुद्दीन नांवाचे मुसलमानी साधूनें उत्तर हिंदुस्थानांतून येऊन पेनूकोंडा येथें ११५५ मधें स्थापिला. येथील जहागीरदारानें (हिंदू) त्याची दैविक शक्ती पाहून त्याला एक देवालय व एक मशिद बांधून दिली हा फकुद्दीन साधु देवळांत राहत असें व त्याचे पुष्कळ सुशिक्षीत हिंदू व मुसलमान भक्त झाले.

(८) साईबाबांचें प्रमाणेंच सुमारें पन्नास वर्षांपूर्वी त्रावनकोर जिल्ह्यात त्रिवेंद्रमचे दक्षिणेस ३० मैलांवर थाकले या गांवी एक पीर महमद नांवाचे मुसलमान साधुपुरुष होऊन गेले. त्या

प्रांतांत त्यांची फार प्रसिद्धी होती. तेथें त्यांची समाधि आहे. त्या समाधीचे हल्ली मशिदींत रूपांतर झालें आहे. परंतु हिंदू व मुसलमान दोन्ही धर्मांचे लोक तेथें पुजा करितात. तेथील वैशिष्ट्य असे आहे कीं, तेथील मुसलमान पुजारी पुजेनंतर हिंदू धर्मात पूज्य मानलेली उदी (विभुती) प्रसाद म्हणून भक्तांस वाटतो. या साधूंचे मलाई भाषेंत पुष्कळ ग्रंथ आहेत. ते वेदांतपर आहेत. त्यांचे विद्यमान स्थितींत त्यांचा पुष्कळ शिष्यवर्ग होता. व ते बहुतेक हिंदूच होते. त्या प्रांतात हिंदू-मुसलमानांचे सख्य फारच अवर्णनीय आहे. गतवर्षी एक युरोपीअन प्रवासी थाकले व केपकामोरीन यांचे दरम्यान असलेले नगरकॉइल येथें गेला असता एका मुसलमान व्यापाऱ्याचे घरीं त्याचे पाहण्यांत आले कीं, तो व्यापारी जरी मूळचा मोठा धंदेवाईक होता, तरी हल्ली त्याचे घर एक वेदांताचा क्लबच झालेला आहे, हिंदू-मुसलमान स्नेही तेथें जमून वेदांत, बायबल व कुराण यांची चर्चा करतात. मुसलमान वेपारी महाभारतादि पुराणांतील गोष्टी सांगत असतांना त्यांचा भक्तीभाव फारच अद्वितीय दिसून येतो.

येणें प्रमाणें बाबांचे अवतार कार्याचे एक तऱ्हेचे निरीक्षण करणेस विश्वनीय उपलब्ध माहिती नमूद करून हा लेख येथेंच तूर्त पुरा करितो.

(अपूर्ण)

श्रीसाईनाथ प्रसन्न

श्री. रा. रा. श्रीधरराव नारायण खारकर, ऑ. सेक्रेटरी यांस

सा. न. वि. वि. आपले पत्र ता. ५।९।४० चें ता. ९।९।४० ला मिळाले व त्यासोबत पाठविलेले कागद पोहोंचले. त्यावरून श्री. साई लीलेंत छापविण्याकरितां श्रीगुरुपौर्णिमेचा हिशोब शीट अकरा शके १८६२ सालचा यासोबत आपणाकडे पाठविला आहे. पोहचल्याचें उत्तर कृपा करून द्यावे कळावे.

आपला

G. B. Wandre

---

## हिशोब जोड श्री सांई महाराज सिर्डी येथील गुरुपैर्णिमा उत्सवाप्रित्यर्थ खर्च झाला. आषाढ शुद्ध १५ संवत १९९६ साल शके १८६२ साल

### जमा

३३॥≋ पेटींतील उत्पन्न, ४४१॥≡९ वर्गणी ( एकंदर, ३६९॥—९ बमोजी हिशोब यादी, ७२८= वर्गणी आलेली, एकूण ४४१॥≡९, ) १२९।–३ श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटी यांचेकडून खर्च झालेली रकम. एकूण ६०५ रु.

### नावे

मुदबक खर्च २१४॥=९, १६॥। शाकभाजी, ९ दुधदही, ९॥।≡ काष्ठ सरपण, ३॥= कपडा पंचे, ४०।=आच्यारी ( स्वयपाकी ), २२॥ गहु मण २ दर ११ प्रमाणें. ४ गुळ

मेली सेर ४०, ८॥ केळीचे द्रोण पान, १३।।।— तेल गोडे, ३७॥— तांदूळ, ३।।।=बेसन
सेर ८८२५, १२॥ तुरीची दाळ पोत १, १।≡ मीठ, १॥। हरभऱ्याची दाळ ८८२,
३६ साखऱ्या पोता १, ।।।≡ पिठी साखर, ४॥≡ रवा सेर ८८३०, १। सुपारी बारसी
८=॥, ।= लवंग, १। बदाम सेर १, ॥— वेलदोडे आदपाव, ।≡ शेंगदाणे ८८=,
८— हिंग तोळे ८८२, ८= चिकन सुपारी, ८≡॥ काथ आदपाव, ।= आमसूल, ८८१
८॥ सैंधव मीठ, ८॥ मिरी, ८=॥ नारळ ५, ८≡॥ खडी साखर, ॥= खोबरे डोल,
८=॥ किसमीस पावभर, ।= मोहरी ८८१, ६९८≡ तुप, ८≡ जीरे, १॥.॥ मसाला,
२॥≡॥ चहा ब्रुक ब्रौंड पुडे ५, ४॥ केसर १॥ तोळा, २ कसोदी ८॥१ पायली,
३१४॥=९, २९॥ **धर्मादाय खर्च**, (१०॥९) देवधामी खर्च ८।।।≡९ नंदादीप, १॥—,
८= गोपाल काल्याकडे, १३।।। इनाम खर्च, ५८— किर्तन बिदागी, २९॥ धर्मादाय खर्च,
१२॥= **रोशनाई चर्च**, १२८—, घासलेट पिपे ३ पैकी रुपये १२, वापसी पिपे।।।≡, १॥
मेंथल पुडा १, ।— आगपेटी वगैरे १२।।।=, २२।=९ **चिल्लर खर्च**, १७।— मजूरी खर्च,
१॥ तासेवाले, १॥ घासगोफ खर्च, ८= नदी उतारी, १॥ चिल्लर खर्च, ॥≡॥ पान २६
सुपारी खर्च २२।=९, ८३८.३ **प्रवास खर्च**, ७०॥—९ रेलवे खर्च, १०॥—६ मोटार
टांगा खर्च, १।।।— हमाली खर्च, ८३८.३, १५।≡३ **पुजेबद्दल सामान**, ॥ उदबती पुडे
२, ८— बुका १८= कापूर ।।।= कवड्या उद, ॥= तेल सुवासिक, १२ पामडी निळी
समाधीवर ८≡ कुंकु ८—॥ गुलाल ८—॥, १५।≡३ १२५८८। **प्रसाद खर्च**, ५६।।।≡
निमंत्रण पत्रीका छपाई वगैरे, ४५॥=॥ प्रसाद पाठविण्याबद्दल २०।=। उत्सवात खर्च
४=॥ पोस्टेज खर्च, १२७.९, ६०५

भगवंत दादाजी शालीग्राम

★



## अनुभव

### संडे टाइम्स, मद्रास, ता २९ सप्टेंबरचे अंकांतील 'धी बॉय महात्मा' या लेखाचा अनुवाद

मद्रास इलाख्यांतील विल्लुपुरम येथील एस. आय. रेल्वे कॉलनीत राहणारा ईश्वराजुलु नाइकर नांवाचा एक फिटर काम करणारा इसम आपले शेजारी लोकांस सांगूं लागला कीं हनुमान देवानें आपणांस स्वप्नांत येऊन सांगितलें कीं आपण त्याचे पोटीं त्याचे राहते घरीं त्याचा मुलगा म्हणून जन्म घेणार. शेजारीपाजारी प्रथम त्याची थट्टा करूं लागले व म्हणूं लागले कीं या देवभोळे माणसास वेड लागले आहे. एका मुसलमान स्नेह्यानें राहते घर सोडून जागेचा त्यास सल्ला दिला. उद्देश हा कीं मग देवाचे भाकीत त्याच घरांत जन्मास येणेनें कसें काय घडून येते तें दिसून येईल. नाइकरानें त्याप्रमाणें करणेचे ठरविलें परंतु दुसरे घरांत राहणेस जाणेंचे अगोदरच त्याची बायको प्रसूत होऊन मुलगा जन्मास आला.

नाइकर हे गृहस्थ मुळचेच भाविक असलेमुळें देवानें खरोखरच आपणांस अद्वितीय संतान दिलें अशी त्याची दृढ भावना झाली व पुढें लवकरच मुलगा दोन वर्षांना होतांच कांहीं प्रौढ ज्ञानाचे शब्द उचारू लागल्यामुळें त्याची भावना खरी ठरली. पुढें त्यानें मुलाचें जोपासनेची पूर्ण खबरदारी घेतली. पिता पुत्र परस्परांस स्वामी या नावानें संबोधूं लागले व घरांत एक भुयार तयार करणेंत आले व त्यांतच तो मुलगा ध्यानस्थ बसत असे. पांच वर्षें वयाचा होतांच मुलांस शाळेंत दाखल करणेंत आला असतां शिक्षकास तो पूर्ण ज्ञानी असलेचें आढळून येऊन आपण त्यास शिकवणेस असमर्थ असलेचें दिसून आले. मुलगा एकपाठी असोन त्याचे बापाचे घरांतच साधूसंतांचें ग्रंथांचें अध्ययन असे व तो त्या ग्रंथांतील वेदांत विषयांवर सोप्या भाषेंत प्रवचने करी. याच सुमारास त्याचे ठिकाणीं त्यागवृत्ती बाणून तो संन्यासी बनला सकाळीं पूर्ण नग्नावस्थेंत असे व दोन प्रहरीं कफनी परिधान करी व रात्रीं एक मोकळेच वस्त्र परिधान करी. आठ वर्षांचा झालेवर तो अरुनाचलवासी भगवान रमण महर्षींचें दर्शनास गेला. त्याचवेळीं महर्षी सायंकाळचे पांच वाजणेंचे वेळीं टेकडीवर फिरतीस गेले होते. त्यावेळीं महर्षींचे आश्रमवासी भक्तांचे या बाल संन्याशाबरोबर वेदांतावर भाषण होऊन ते सर्व याचे ज्ञानामुळें थक्क होऊन गेले. स्वामी आपले गुहाहॉलमधें परत येतांच या बालसंन्याशाचे समोर बसले. सुमार पाऊण तास ते असे बसले होते. ते वेळीं पूर्ण शांतता नांदत होती. बालसंन्याशानी स्वामीकडे पाहतांच त्यांचें नेत्रांतून आश्रू वाहूं लागले. ते त्यानी

आपल्ये हाचे हातांनी पुशिले व आपणांस आशाच आपली ओळख पटेनेची आहे म्हणून ते तेथून ते निघाले.

त्यावेळी महर्षींना तेथील एका भक्तानें या बालकाविषयीं विचारितां महर्षी म्हणाले की त्याचे मागील जन्माचे संस्कार त्याचें ठिकाणी जागृत आहेत परंतु ते मनःशांती व स्थैर प्राप्तीविना उद्बोधित होणें नाहीत.

हे बाल संन्यासी साधुसंतांची ठिकाणें फिरत असतात. असे ते फिरत असतां चिदम्बरम येथील रामलिंग स्वामींचे समाधी समोर या दश वर्षाचे मुलाचे वेदान्त प्रवचन सुरू असोन श्रोतृसमुदाय थक्क झालेलें मि. डंकन ग्रीनलीज, बालगुरुकुलचे प्रिन्सीपाल यांचे पहाणेंत आल्यापासून तेच या बालसंन्याशाचे पालक बनले आहेत. हल्ली कफनी परिधान केलेले बालसंन्यासी बालगुरुकुल, रॉय पेठ मद्रास येथें पाहुणे म्हणून आलेले आहेत.

यांचा देह आवर्णनीय बांधेसुद आहे अंगास विभुती लावलेली, डोके साफ गोटा केलेले, वर एक रुद्राक्षाची माळ, बसेणम व्याघ्रचर्म व बैठक मांडी घातलेली दर्शनास येणारास हासत मुखानें आशिरवाद देऊन बाल हस्तानें विभुती लावणें हा देखावा देवादिकांसही पहावासा वाटेल.

सर्वांशी यांचे वर्तन मनमिळाऊ असोन लहाना बरोबर लहान मोठ्याबरोबर गहन विषयांवर चर्चा व थट्टामस्करी असा कार्यक्रम असतो. आहार फक्त एक वेळचाच. हल्ली मद्रास येथील गुरुकुलांत वास्तव्य आहे तेव्हां आजूबाजूचे झाडाखालींच यांची प्रवचने चालतात. हिंदू, मुसल्मान, खिश्चन वगैरे सर्व धर्मीयांचे थवेच्या थवे तेथें ऐकण्याकरितां जमतात.

एका प्रवचनांत त्यानीं सांगितलें कीं विधकर्म्यानें निरनिराळे प्राणी निर्माण केले आहेत. प्रथमच माझें पहाणेंत आगगाडी आली तेव्हां ती करणाराचे मला कौतुक वाटले व त्याच प्रमाणें मोटार, आगबोट विमानाविषयींही वाटलें. परंतु या सर्वांचेवर मनुष्य देहाची रचना और आहे. फुटबॉलला कांटे लागून भोके पडलेमुळें हवा निघून जाते परंतु मानव देहाला नऊ भोके असूनही प्राण वायु त्यांत राखणेची योजना करणाराची कृती किती अजब आहे. अशा आजब महालांत आवयवरूपी नोकर वर्गासह मनरूपी राणी वावरत असते. ही मोठी बंडखोर आहे व जरा मोकळीक मिळतांच बंड पुकारते. व नाशास कारण होते. याच राणीचे बंदोबस्ताकरितां अबाधित धर्म संस्था व साधुसंताचे अवतार व त्यांची शिकवणूक आस्तित्वांत आल्या आहेत. वर्ण भेद, साधने फक्त सत्यांची आस्था उत्पन्न करितात; परंतु मनः शांती व स्थैर प्राप्ती विना मनुष्य प्राण्याची उन्नति होणें अशक्य आहे. म्हणूनच महर्षी मनशोधन गांधी सत्यशोधन व आरविंद योग साधन सांगतात. प्रत्येकानें ध्यान धारण भक्ती केली पाहिजे. व गीतेंत सांगितले प्रमाणें समत्व अंगिकारले पाहिजे. कोणीही सर्व सुखी नाही. कुडींत प्राणवायू आहे तेथपर्यंत प्रत्येकानें वासनाक्षय केला पाहिजे.

॥ श्री साईबाबा ॥

# जाहिर खबर.

## " क्लार्क आणि कंपनी " मुंबई यांची
## अत्यंत उपयुक्त औषधें.

हैं [illegible] अनेकवेळ देशी किती कमतीचे आहे हे रोगाच्या [illegible] आली काय शकलेल्या नाही. वरील कंपनीची औषधें बाजारांत येऊन मुंबईत व गुजराथ प्रांतांत डॉक्टर लोक त्यांचा उपयोग प्राधान्यानें करूं लागले आहेत. फक्त सामान्य लोकांस त्यांची विशेषशी माहिती दिसत नाही.

हल्लीचे परिस्थितीत विदेशी औषधें दुरापास्त होऊन त्यांच्या किंमती भरमसाट वाढलेल्या आहेत. या परिस्थितीत हमेश लागणारी व उत्तम उपयुक्त अशी क्लार्क कंपनीची औषधें माफक किंमतीत देण्याची योजना या देशी औद्योगिक कंपनीने केलेली आहे व ती बाजारांत [illegible] मिळू शकतात.

१ फोर्मेंटिंग:— हे विलायती अँटीफ्लोजेस्टिनचे तोडीचे असून न्यूमोनियादि रोगांत फार उपयुक्त आहे.

२ ऑक्थो डॉक्स:— हे मलम विलायती आयोडेक्सचे तोडीचे असून वाऱ्याची सूज, जखम व त्वचेचे सर्व रोग यावर चोळल्यानें त्वरित गुण येतो. घरांत संग्रही ठेवण्यासारखें आहे.

३ या शिवाय आव, धुरणी, गरमी व परमा यांचेवरील अत्यंत गुणकारी औषधें तयार आहेत.

व्यापाऱ्यांस भरपूर कमिशननें व डॉक्टरांस माफक दरानें महाराष्ट्रांत मिळण्याची योजना.

ऑर्डर्स खालील एजंट मार्फत नोंदवा :—

## मेसर्स खारकर ब्रदर्स.

३७, चरई रोड, ठाणें.

---

## List of books about Shri Sai Baba.

Madras books available at Sai Samsthan, Shirdi, P. O. Rahata, Dist. Ahmednagar.

For Gujrathi:—

"Guru Smriti," " Manache Shloka " & " Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

For Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle.

**For Authentic Photos of Sai Baba:—**

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Saileela, Dadar, (sizes available card, cabinet, little bigger locket and bigger, enlargement.)

**For Guide to Shirdi in English:—**

write to the clerk, Shirdi Sansthan, at Shirdi, Post Rahata, Dist. Ahmednagar

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to–Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.


छातीचे विकारांवर

सांडू बदर्स यांचे

हार्टिना

Regd.

(HEARTINA)

**HEARTINA**

Excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखं वाटणें, छातींत धडधड होणें, फुफ्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

बा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)

सविस्तर माहिती साठीं लिहाः—

द. कृ. सांडू बदर्स, चेंबूर, लि.

आर्योषधि कारखाना.

चेंबूर–मुंबई.


सूचनाः—कोणास जाहिराती देणे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas-Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North Dadar, Bombay 14